राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२३

# शाळेला सुट्टी..शिकू नव्या गोष्टी...


सादरकरता :श्री समीर अशोक चांदरकर

कलाशिक्षक

वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टा

तालुका मालवण जिल्हा सिंधुदुर्ग


गट:  माध्यमिक


शैक्षणिक अर्हता : ए.टी.डी, जी.डी, आर्ट, आर्ट मास्टर

अध्यापन अनुभव : २१ वर्षे

मार्गदर्शक श्री संजय सुभाष नाईक (मुख्याध्यापक

वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय तालुका मालवण

जिल्हा सिंधुदुर्ग



# अनुक्रमणिका


- नवोपक्रमाची प्रस्तावना,गरज व महत्व
- नवोपक्रमाची उदिष्टे
- नवोक्रमाचे नियोजन
- नवोक्रमाची कार्यपद्धती
- नवोक्रमाची यशस्विता
- समारोप
- संदर्भ सूची व परिशिष्टे

# प्रस्तावना

'जीवनस्यभूषणम कला',ही कला जीवनातून उत्पन्न होते. प्रत्येक व्यक्तीमध्ये लपलेली असते. कलेच्या विविध माध्यमातून ती व्यक्त होत असते चित्र, शिल्प, गायन, वादन,नाट्य अशा विविध कलांच्या माध्यमातून कलाकार आपले जीवन समृद्ध करत असतो. आपल्या कलाकृतीच्या माध्यमातून तो स्वतःबरोबरच इतरांनाही त्यांचा आनंद देतो.

शालेय जीवनात ही कलेचे अनन्य साधारण महत्त्व आहे. या वयात झालेले संस्कार आयुष्यभर आदर्श व्यक्ती म्हणून जगण्यासाठी पुरेसे असतात. याच वयात भविष्यातील आपली ओळख बनवण्याची संधी प्राप्त होते. व्यावसायिक शिक्षणाबरोबरच कलाशिक्षणही मुलांच्या उज्वल भवितव्यासाठी आवश्यक आहे. परंतु अलीकडच्या माहिती तंत्रज्ञानाच्या प्रचंड प्रभावामुळे मुले आपले बालपण विसरली आहेत सातत्याने मोबाईलवर सोशल मीडिया व्हिडिओ गेम यामुळे मुले एकमेकांशी पालकांशी दुरावत चालली आहे मुलांमधील संयम एकाग्रता कामाविषयीची तळमळ समूहात काम करण्याची सवय आदर कुठेतरी कमी होताना दिसत आहे.

मुलांचा आत्मविश्वास वाढवा त्यांच्यातील सुजनशिलतेला वाव मिळावा सांघिकृती बळकट व्हावी, संयम, एकाग्रता वाढावी. त्याचबरोबर अभ्यासक्रमाचा थोडासा ताण कमी करून मिळालेल्या शाळेच्या सुट्टीचा उपयोग करून नवीन गोष्टी शिकण्यासाठी मुले प्रवृत्त व्हावी यासाठी
शाळेला सुट्टी... शिकू नव्या गोष्टी.... हा उपक्रम राबवण्याचे ठरवले..

# गरज व महत्व

हा नवोपक्रम निवडण्यामागे इतरही महत्वाची कारणे आहेत ती पुढील प्रमाणे

❋आपला शालेय परिसरातील भिंती बोलक्या व्हाव्यात , आणि हे काम मुले सुद्धा करू शकतात हा आत्मविश्वास निर्माण व्हावा तसेच (BALA)बाला या उपक्रमांतर्गत शालेय सुशोभीकरणांमध्ये मुलांचाही सहभाग महत्त्वाचा आहे यासाठी हा उपक्रम करण्याचे ठरवले

❋शालेय परिसरा बरोबरच गावातील सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या अस्वच्छतेबाबत जनजागृती व्हावी यासाठी मुलांच्या माध्यमातून सामाजिक संदेश देणारी भित्तीचित्रे रंगवण्याचे ठरवले.

❋कलेच्या माध्यमातून अर्थाजनाच्या संधी निर्माण होऊ शकतात याची जाणीव विद्यार्थ्यांना या वयात व्हावी हा या उपक्रमा मागचा उद्देश आहे.

❋मोबाईलच्या अतिवापरामुळे एकलकोंडी झालेल्या मुलांना एकत्र आणून त्यांच्यातील सांघिक कृतीला चालना देणे.

❋कलेच्या माध्यमातून नवनिर्मिती विविध संकल्पना प्रत्यक्षात उतरणे स्वतःची वेगळी ओळख निर्माण व्हावी यासाठी आत्मविश्वास वाढावा यासाठी या उपक्रमाची मदत होऊ शकते

❋राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार अभ्यासक्रमात कला एकात्मिक शिक्षणाला अधिक महत्त्व दिलेले आहेत हे एकात्मिक शिक्षण साध्य करण्यासाठी कलेची अभ्यासक्रमाशी सांगड घालणे आवश्यक आहे.

## • नवोपक्रमाची उद्दिष्ट

- १ विद्यार्थ्यांना मिळणार दीर्घ शालेय सुट्टीचा सदुपयोग व्हावा तसेच त्यांना नवनवीन गोष्टी शिकता याव्यात
- २ विद्यार्थ्यांमध्ये कलेविषयी अभिरुची निर्माण करणे
- ३ कलेच्या माध्यमातून नवनिर्मिती विविध संकल्पना प्रत्यक्षात उतरणे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे
- ४ विविध राष्ट्रीय राज्यस्तरीय स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे
- ५ कलेच्या माध्यमातून अर्थार्जनाच्या संधी उपलब्ध करणे
- ६ मोबाईलच्या व्यसनातून मुलांना दूर करून त्यांची कार्यक्षमता वाढवणे
- ७ चित्रांच्या माध्यमातून सामाजिक संदेश देत जनजागृती करणे
- ८ कमी खर्चामध्ये शालेय परिसरातील शाळेच्या भिंती रंगवण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे

# नवोपक्रमाचे नियोजन

## उपक्रम पूर्वस्थितीचे निरीक्षण :

कोरोना महामारीनंतर जवळपास दोन वर्षांनी शाळा पूर्ववत झाल्या परंतु या दोन वर्षात मुलांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान  झाले हे नुकसान भरून काढण्यासाठी भाषा विज्ञान आणि सामाजिक शास्त्र या विषयांवर जास्त भर देण्यात आला. त्यामुळे कला शारीरिक शिक्षण कार्यानुभव यासारख्या मुलांच्या प्रतिभेला सृजनशीलतेला वाव देणाऱ्या विषयांकडे थोडेसे दुर्लक्ष होऊ लागले. त्यामुळे अध्यापन नीरस होण्याची दाट शक्यता होती. परंतु शालेय वेळेत कलाविषयक उपक्रम घेणे शक्य नव्हते त्यामुळे मुलांना मिळणाऱ्या दीर्घ सुट्टीचा तसेच विविध सणानिमित्त मिळणाऱ्या सुट्ट्या, रविवारी मिळणारी सुट्टी, या सुट्ट्यांमध्ये विविध कौशल्य विकसित करणारे उपक्रम घेण्याचे ठरवले

## संबंधित व्यक्तींशी तज्ञांशी चर्चा :

अभ्यासातून येणारा ताण  कमी व्हावा मुलांमधील सुजन शिलतेला वाव मिळावा, त्यांच्यातील सांघिक कृतीला चालना मिळावी, व शालेय सुट्ट्यांमध्ये मुलांनी नवनवीन गोष्टी शिकाव्यात इत्यादींसाठी प्रशालेचे मुख्याध्यापक व संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांशी चर्चा केली. यावेळी वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टाचे मुख्याध्यापक श्री संजय सुभाष नाईक यांनी कोणकोणते उपक्रम आपण राबवू शकतो याबाबत मार्गदर्शन केले व या उपक्रमाची सुरुवात शालेय भिंती बोलक्या करण्यापासून करूया असे सुचवले तसेच मे महिना व दिवाळीची सुट्टी रविवारी या सुट्ट्यांमध्ये कोणकोणते उपक्रम राबवू शकतो यासंबंधी ही चर्चा झाली.

## आवश्यक साधनांचा विचार :

मुलांच्या कल्पकतेला वाव देण्यासाठी कलाविषयक उपक्रम राबवायचे असल्यामुळे रंग ब्रश पेन्सिल कागद माती रोलर पेपर इत्यादी साहित्य मुलांना प्रशालेमार्फत पुरविण्याचे ठरविले.

## करावयाच्या कृतीचा क्रम:

१) वरिष्ठ अधिकारी व तज्ञांशी चर्चा करणे

२) संबंधित विद्यार्थी व पालकांशी चर्चा करणे

३) नवोपक्रमाचे उचित नियोजन व व कागदावर त्याची मांडणी करणे

४) विद्यार्थ्यांना वॉल पेंटिंग,फेस पेंटिंग,पेपर प्लेट पेंटिंग, क्राफ्ट मेकिंग असे विविध उपक्रम राबवण्याबाबत

मार्गदर्शन करणे

५) उपक्रम राबवताना येणाऱ्या समस्यांबाबत विद्यार्थी पालक यांच्याशी चर्चा व मार्गदर्शन

६) विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष कृती करून घेणे

७) या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या बदलाबाबत निरीक्षणे नोंदविणे.

## उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :

सदर उपक्रम राबल्यानंतर त्यांचे खूप सकारात्मक परिणाम दिसू लागले. जसे मुले एकत्र येऊन एकमेकांच्यासहकार्याने कलाविषयक उपक्रम करत होती. त्याचबरोबर मुलांच्या माध्यमातून नवीन संकल्पना स्पष्ट झाल्या.

शालेय सुट्टीचा उपयोग चांगल्या कामासाठी होतो हे पाहून पालकांनी समाधान व्यक्त केले. या उपक्रमांच्यामाध्यमातून मुलांमधील सर्जनशीलतेला वाव मिळाला त्यांच्यातील आत्मविश्वास वाढला. या कालावधीत झालेल्या विविध जिल्हास्तरीय राज्यस्तरीय राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये मुलांचा सहभाग व यशस्वीतेचे प्रमाणही वाढले.

| कार्यवाहीचे टप्पे वेळापत्रक | | |
|---|---|---|
| अ.क्र. | महिना | शालेय सुट्टीच्या कालावधीत घेतलेले उपक्रम |
| १ | उन्हाळी सुट्टी: (३जुन २०२३ ते१० जून २०२३) | शालेय परिसर सुशोभीकरण अंतर्गत शाळेच्या भिंतीवर शैक्षणिक व सामाजिक भित्तिचित्रे रेखाटणे. |
| २ | रविवार २५ जून २०२३ | विविध झाडांच्या सालींपासून बनवलेल्या प्लेटवर ऍक्रेलिक रंगांच्या माध्यमातून विविध पक्षांची व निसर्ग चित्राचे रेखाटणे करणे |
| ३ | रविवार २९ जून २०२३ | आषाढी एकादशीनिमित्त संतांच्या विविध अभंग कॅलिग्राफी व व्यक्ती चित्रांचे प्रदर्शन... |
| | शनिवार १७ सप्टेंबर२०२२ | फेस पेंटिंग: आफ्रिकेतून भारतातील कुनो अभयारण्यात आणलेले चित्त्यांचे स्वागत प्रशालेतील विद्यार्थ्यांनी स्वतःचे चेहरे चित्त्याच्या रूपात रंगून केले. |
| ५ | मंगळवार१५ ऑगस्ट२०२३ स्वातंत्र्य दिन, | अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनाच्या सांगता समारंभाचे औचित्य साधून 75 फूट लांबीचे पोस्टर तयार करणे. |
| ६ | शनिवार १६ सप्टेंबर २०२३ | गणेश चतुर्थीच्या उत्सवानिमित्त माती पासून मूषक बनवणे |
| ७ | रविवार १५ ऑक्टोबर२०२३ | सरस्वती पूजन कार्यक्रमानिमित्त चांद्रयान ३ ची प्रतिकृती बनवणे |
| ८. | रविवार ५ नोव्हेंबर२०२३ | दीपावली सणानिमित्त पर्यावरण पूरक आकाश कंदील बनवणे. |
| ९ | १५नोव्हेंबर२०२३ ते २० नोव्हेंबर२०२३ | दीपावलीच्या सुट्टीमध्ये कट्टा परिसरातील एसटी स्टँड सफाई व सामाजिक संदेश देणारी भित्ती चित्रे रंगवणे.. |

## उपक्रमासाठी मदत :

या उपक्रमासाठी प्रशालाचे मुख्याध्यापक श्री संजय सुभाष नाईक यांची मदत झाली तसेच कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री अजयराज वराडकर व सर्व संचालक मंडळाचे सहकार्य  लाभले, मोठ्या परिसरामध्ये भित्ती चित्रे रंगवायची असल्यामुळे प्रशालेचे माजी विद्यार्थी ज्यांनी कलाशिक्षण घेतले आहे असे राहुल जाधव, आकाश बिरमोळे,प्रसाद मेस्त्री यांची मदत व मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले.

# उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे

शाळेला सुट्टी, शिकू नव्या गोष्टी.. या नवोपक्रमाच्या व्हिडिओची युट्युब लिंक इथे दिलेली आहे..

https://youtu.be/EMWVzDPlRXo?si=2W3AiZN3wMHKL8zo

१)विद्यार्थ्यांनी केल्या शालेय भिंती बोलक्या:

https://youtu.be/09aaV6xwiPI?si=xZlI0r1_EX0lGS30



## रंगरेषांनी झाल्या शाळेच्या भिंती बोलक्या!

### विद्यार्थ्यांचा उपक्रम; कट्टा हायस्कूलमध्ये सामाजिक संदेश देणारी चित्रे

**ओरोस, ता. १४ :** तब्बल दोन वर्षांनंतर शैक्षणिक वर्ष नियमित वेळेत काल (ता. १३) सुरू झाले. तर उद्या (ता. १५) विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत बसणार आहेत. कोरोनामुळे शाळेच्या पहिल्या दिवसाचा आनंद मुलांना घेता आला नव्हता. यंदा तो मिळणार आहे; मात्र, हा आनंद अधिक द्विगुणित करण्याचा प्रयत्न कट्टा (ता. मालवण) येथील वराडकर हायस्कूलच्या मुलांनी केला आहे. आठवी ते दहावीतील चित्रकलेची आवड असलेल्या विद्यार्थ्यांनी शाळा सुरू होण्यापूर्वी चक्क शाळेच्या भिंती विविध संदेश देणारी चित्रे काढून बोलक्या केल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

दरवर्षी १५ जूनला शाळा सुरू होते. परंतु, कोरोनामुळे दोन वर्षांत तो आनंदाचा क्षण मुलांच्या वाट्याला आला नाही. मात्र, उद्या महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये मुले शाळेची पायरी अगदी आनंदाने उत्साहाने चढणार आहेत. मुलांचा हाच आनंद उत्साह कायम ठेवण्यासाठी वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टामध्ये शालेय परिसर सुशोभीकरणचे काम हाती घेतले आहे.

यासाठी मुख्याध्यापक संजय नाईक यांनी पुढाकार घेतला आहे. प्रशालेचे कला शिक्षक समीर चांदरकर याच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील आठवी, नववी व दहावीचे विद्यार्थी प्रतीक्षा मेस्त्री, सिद्धाली पांचाळ, सानिया कुडतरकर, मिथिल आंगचेकर, श्रेया चांदरकर, रुची ढोलम, पूर्वा मेस्त्री, पूर्वा चांदरकर, रश्मी पांचाळ, माजी विद्यार्थी आकाश बिरमोळे, राहुल जाधव, प्रसाद मेस्त्री, वेदांत पोटफोडे यांनी शाळेच्या दर्शनी भिंतीवर वेगवेगळे सामाजिक संदेश देणारी पोस्टर रंगविली आहेत. विद्यार्थ्यांनी उत्साहाने भिंतींवर अॅक्रीलिक कलरचा वापर करून या चित्रांमध्ये विद्यार्थ्यांनी जीव ओतला आहे. यात मुलींचे शिक्षण, योगाचे जीवनातील महत्त्व, पर्यावरण संवर्धन, मोबाईलचे दुष्परिणाम, धूम्रपानाचे दुष्परिणाम, पुस्तकांशी मैत्री, देशाभिमान असे सामाजिक संदेश देणारी पोस्टर्स आहेत. शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अजयराज वराडकर, शालेय समिती अध्यक्ष सुधीर वराडकर आदींनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

**विद्यार्थ्यांच्या कलेचे कौतुक**

आपल्या मे महिन्याच्या सुटीचा योग्य वापर करत मुलांनी कलात्मक वृत्तीला जोपासले आहे. बऱ्याच वेळा असे रंगकाम व्यावसायिक चित्रकार असलेल्या माणसांकडूनच करून घेतले जाते. परंतु, या चित्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी त्यांच्यावर दाखवलेला विश्वास सार्थ करून दाखवला.

**कट्टा : वराडकर हायस्कूलच्या भिंतीवर रेखाटलेली सामाजिक संदेश देणारी चित्रे.**

२) प्लेट पेंटिंग वर्कशॉप :



## वराडकर हायस्कुल येथे प्लेट पेंटिंग प्रदर्शन

**मसुरे (प्रतिनिधी):**

कट्टा येथील वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय या प्रशालेत प्लेट पेंटिंग प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले .या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी पोफळीच्या सालापासून तयार करण्यात आलेल्या डिनर प्लेटवर अक्रेलिक कलरच्या साहाय्याने सुंदर चित्रे काढली.त्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रातील विविध पक्षी ,लघुचित्रशैलीतील काही चित्रे देखावे अशा विविध कलाकृती रेखाटून या प्लेट अधिक आकर्षक बनवल्या .इयत्ता सातवी ,आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी या कलाकृती बनवल्या .यासाठी कलाशिक्षक श्री समीर चांदरकर यांनी मार्गदर्शन केले .

कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव श्रीमती विजयश्री देसाई, तसेच सचिव श्री सुनील नाईक, बॅरिस्टर नाथ पै सेवांगण शाखा कट्टाचे कार्याध्यक्ष श्री दीपक भोगटे यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले .तसेच कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय अजयराज वराडकर व सर्व संचालक मंडळ यांनी या उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या .प्रशालेचे मुख्याध्या[illegible] के .कांबळे, ज्येष्ठ शिक्षक संजय नाईक, वराडकर इंग्लिश मीडियम स्कूल चे मुख्याध्यापक श्री नाईक सर., डॉ. दादासाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय प्राचार्य जमदाडे सर सर्व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कट्टा येथील वराडकर हायस्कुल येथे प्लेट पेंटिंग प्रदर्शनाचे उदघाटन करताना विज[illegible] सुनील नाईक, दीपक भोगटे व अन्य मान्यवर (छाया : झुंजार पेडणेकर)

३) फेस पेंटिंग वर्कशॉप : https://youtu.be/eMoE44SpT8s?si=xb2QQ62kJJndIs3a



शब्दांना सत्याची धार

**प्रहार**

कट्टा येथील वराडकर हायस्कुलच्या फेस पेंटिंग केलेल्या विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापक संजय नाईक, कलाशिक्षक समीर चांदरकर, भूषण गावडे व अन्य. (छाया : झुंजार पेडणेकर)

## ...अन् विद्यार्थीच झाले चित्ते!

**मसुरे (प्रतिनिधी):**

१७ सप्टेंबरला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मध्य प्रदेशातील कुनो अभयारण्यात चित्ते सोडण्यात आले. १९५२ ला चित्ता भारतातून नामशेष झाल्याचे घोषित केले होते. आज जगातील फक्त १७ देशांमध्ये चित्ता आढळून येतो.

भारतात झालेल्या चित्त्यांच्या आगमनाने विद्यार्थ्यांमध्ये सुद्धा चित्त्याबद्दल असलेले कुतूहल लक्षात घेऊन वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टाच्या कला विभागामार्फत फेस पेंटिंगच्या माध्यमातून मुलांचे 'चित्त्याच्या' रूपातील मुखवटे रंगवण्यात आले. यासाठी प्रशालेतील हरहुन्नरी विद्यार्थी क्षितीज गवाणकर, ममता आंगचेकर, अनिरुद्ध गायकवाड, श्रेया चांदरकर या विद्यार्थ्यांनी कलाशिक्षक श्री. समीर चांदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचे सुंदर मुखवटे रंगवले. यासाठी इयत्ता पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग दर्शवला. यासाठी प्रशालेतील सहाय्यक शिक्षक श्री भूषण गावडे यांचे सहकार्य लाभले. मुख्याध्यापक श्री. संजय नाईक यांच्या प्रेरणेने हा उपक्रम यशस्वी झाला.

यावेळी चित्त्याच्या मुखवट्यातील विद्यार्थ्यांनी प्रत्येक वर्गात जाऊन चित्त्यांविषयी माहिती दिली. या उपक्रमाच्या माध्यमातून आपल्या पर्यावरणात प्रत्येक प्राण्याचे महत्त्व फार मोलाचे आहे याची जाणीव जागृती मुलांमध्ये निर्माण झाली. या उपक्रमास कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसार मंडळाचे अध्यक्ष अजयराज वराडकर व सर्व संचालक मंडळ यांनी शुभेच्छा दिल्या.

४) आषाढी एकादशीनिमित्त चित्रप्रदर्शन

https://youtu.be/niPIlSAy1_Q?si=yMeNRVH2LqmrYedK



५) १५ ऑगस्ट निमित्त ७५ फूट लांबीचे भव्य पोस्टर पेंटिंगhttps://youtu.be/1nRe3Fs_4xg?si=uubKeVfvu8krM-lM




६) माती पासून मूषक बनवणे :

https://youtu.be/l0zJx_Ufhfg?si=A8RznU32Xd0lbTvb



# विद्यार्थ्यांनी बनविले पर्यावरणपूरक 'मूषक'

## वराडकर प्रशालेचा उपक्रम : कट्टा येथे कार्यशाळेस प्रतिसाद

**सकाळ वृत्तसेवा**

मालवण, ता. २० : गणेशोत्सवाचे औचित्य साधून कट्टा येथील वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या कलाविषयक समितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून मातीपासून पर्यावरणपूरक मूषक बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. एका हातात मोदक आणि दुसऱ्या हातात सामाजिक संदेश असलेले अबदागीर घेतलेले विविध आकर्षक मूषक विद्यार्थ्यांनी साकारले. या उपक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण वाचवा, झाडे लावा, झाडे जगवा रक्तदान श्रेष्ठदान, मोबाईलचा अतिवापर टाळा असे विविध सामाजिक संदेश देण्यात आले.

कोकणातील मूर्तिकार मातीपासून सुंदर गणेशमूर्ती बनवितात. मुलांनाही प्रत्यक्ष मातीकामाचा अनुभव मिळावा व त्यांनी बनविलेली कलाकृती गणपतीच्या आरासाचा एक भाग असावा, या दृष्टिकोनातून पर्यावरणपूरक मूषक बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन न्यू इंग्लिश स्कूल, पेंडूरचे माजी कलाशिक्षक सुधाकर कदम, गोळवणचे माजी सरपंच आबा परब, वराडकर हायस्कूलचे मुख्याध्यापक संजय नाईक यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांना कलाशिक्षक समीर चांदरकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेसोबतच विद्यार्थ्यांची स्पर्धाही घेण्यात आली. याचे परीक्षण सुकळवाड येथील प्रसिद्ध मूर्तिकार अरुण पालकर व पेंडूर येथील मूर्तिकार अनिल सावंत यांनी केले. यशस्वी विद्यार्थ्यांना आकर्षक सन्मानचिन्ह व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना शामदीप प्रिंटर्स, कट्टा यांच्यामार्फत सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ कट्टाचे सचिव सुनील नाईक, विजयश्री देसाई व सर्व सहकारी शिक्षक यांनी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांसोबत मूषक बनविण्याचा अनुभव घेतला. कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अजयराज वराडकर व सर्व संचालक मंडळाने या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक केले.

कट्टा : येथील वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक मूषक बनविण्याचा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविला.

७) सरस्वती पूजन कार्यक्रमानिमित्त चांद्रयान तीन ची प्रतिकृती बनवणे :
https://youtu.be/-CyyM2Gx0AI?si=E2cyxo0f2J9TmCGT


कट्टा : वराडकर हायस्कूल येथे सरस्वती पूजनानिमित चांद्रयान-३ मोहिमेची साकारलेली प्रतिकृती लक्षवेधी ठरली.

**कट्टा वराडकर हायस्कूलमध्ये साकारला 'चांद्रयान' देखावा**

**मालवण :** कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ कट्टा संचालित वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय या प्रशालेत सरस्वती पूजन कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांच्या मनात चांद्रयान-३ विषयी अधिक माहिती मिळावी, या उद्देशाने चांद्रयान ३ बनविणारे शास्त्रज्ञ, प्रत्यक्ष चांद्रयान, विक्रम लँडर, प्रज्ञान रोव्हर यांची पर्यावरणपूरक साहित्यापासून साकारण्यात आलेली प्रतिकृती लक्षवेधी ठरली. कलाशिक्षक समीर चांदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी ही प्रतिकृती साकारली. कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अजयराज वराडकर, उपाध्यक्ष आनंद वराडकर, शेखर पेणकर, सचिव सुनील नाईक, सचिव विजयश्री देसाई व सर्व संचालक मंडळ, शालेय समिती अध्यक्ष सुधीर वराडकर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. प्रशालेचे मुख्याध्यापक संजय नाईक, शालेय संसद उपाधिपती किसन हडलगेकर, शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

८) दीपावली निमित्त आकाश कंदील बनवणे :
https://youtu.be/CfEabwaHOt4?si=tJvtbS1Ne70tiKME



९) दीपावली सुट्टीत एसटी स्टँड स्वच्छता व सामाजिक संदेश देणारी भित्तीचित्रे रंगवणे :
https://youtu.be/Lh__4dTE1vY?si=rhkvNXv5Bf8NXuaZ


**भित्तीचित्रांतून मालवणातील भिंती झाल्या बोलक्या**

वराडकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा सामाजिक संदेश

तळेरे, दि. २१ (सा. वा.) - दिवाळीची सुट्टी म्हणजे धमाल, मजा आणि मस्ती, पाहुण्यांकडे जाणे, एखाद्या प्रेक्षणीय स्थळांना भेटी देणे असे बरेच आराखडे तयार केले जातात, परंतु याच सुट्टीचा सदुपयोग मालवण तालुक्यातील कट्टा येथील वराडकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी भित्तीचित्रांच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्यासाठी केला.

कट्टा येथील बस स्टॅण्ड परिसरात कचऱ्याचे साम्राज्य पसरले होते. २ ऑक्टोबर रोजी विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक संजय नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा परिसर स्वच्छ केला होता. मात्र एसटी बस स्टॅण्डच्या भिंती जाहिरातींच्या फाटलेल्या कागदामुळे विद्रूप झालेल्या होत्या. हा परिसर सुंदर दिसावा, स्वच्छतेचे महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी या भिंती स्वच्छ करत त्यावर रंगरंगोटी केली. त्याचबरोबर प्लॅस्टिक वापराचे दुष्परिणाम, तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणारे आजार, वृक्ष संवर्धन, स्वच्छ भारत सुंदर भारतचा संदेश देणारी भित्तीचित्रे विद्यार्थ्यांनी रंगवली. यामुळे भिंतीही बोलू लागल्या आणि परिसरही सुशोभित दिसू लागला. विद्यार्थ्यांना कलाशिक्षक समीर चांदरकर यांनी मार्गदर्शन केले. किसन हडलगेकर, शिपाई धनंजय शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या रश्मी पाटील, कट्टा सरपंच शेखर पेणकर यांचे यासाठी सहकार्य लाभले. कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अजयराज वराडकर, उपाध्यक्ष आनंद वराडकर, सचिव सुनील नाईक, विजयश्री देसाई, शालेय समिती अध्यक्ष सुधीर वराडकर, मुख्याध्यापक संजय नाईक यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

**या विद्यार्थ्यांचा सहभाग**

या उपक्रमात रिया भगत, मिथिल आंगचेकर, सानिया कुडतरकर, श्रेया चांदरकर, हर्षदा हडलगेकर, श्लोक चांदरकर, देवयानी शिंदे, तन्वेज शिंदे या विद्यार्थ्यांनी सहभागी होत रंगकाम केले.

# १ पूर्वस्थितीचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी :

१ कोरोना आपत्तीनंतर शालेय अभ्यासक्रमातील भाषा, गणित, शास्त्र या विषयांचे प्राधान्य क्रमाने अध्यापन होत

असल्याने कला कार्यानुभव अशा मुलांच्या सृजनशीलतेला वाव देणाऱ्या विषयांकडे दुर्लक्ष होत होते.

२) ऑनलाइन अभ्यासक्रमाच्या सवयीमुळे मुले जास्तीत जास्त वेळ मोबाईल सोशल मीडिया यामध्ये वेळ वाया

घालत होती.

३) त्यामुळे मुलांची एकलकोंडी प्रवृत्ती वाढत होती सांघिक कृतीत विद्यार्थी सहभागी होत नव्हते.

४) तालुका,जिल्हा, राज्य, राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग अतिशय कमी होता.

५) आपण नवनिर्मिती कार्यास सहभागी होऊ शकतो याबद्दल विद्यार्थी संभ्रमात होते.

६) कला क्षेत्रामध्ये ही अर्थार्जनाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात याबद्दल विद्यार्थी अनभिज्ञ होते.

७) पालकांचा कला कार्यानुभव यासारख्या विषयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक होता.

# कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे:

सुट्टीतील सर्वच उपक्रम हे कलाविषयक असले तरी ते राबविण्या मागची कारणे वेगवेगळी होती. प्रत्येक उपक्रमातून विद्यार्थ्यांनी नवीन कौशल्य आत्मसात करावी हा त्यामागील मुख्य उद्देश होता.

. १) उन्हाळी सुट्टीतील उपक्रम ( विद्यार्थ्यांनी केल्या शालेय भिंती बोलक्या ) या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शालेय आवारतील भिंतीवर विविध सामाजिक शैक्षणिक संदेश देणारी भीती चित्र रंगवली. यासाठी त्यांनी स्वतः इंटरनेटच्या माध्यमातून विविधचित्रांचा संग्रह केला.चित्र मोठ्या आकारातील असल्यामुळे ती रंगवण्यासाठी लागणारे कौशल्य आत्मसात केले.

२) प्लेट पेंटिंग वर्कशॉप :

जून महिन्यात घेतलेल्या उपक्रमामुळे टाकाऊ वस्तूंचा उपयोग करून आपण त्यावर सुंदर चित्र निर्मिती करू शकतो व त्यातून अर्थाजन होऊ शकते हा आत्मविश्वास मुलांमध्ये वाढला..

३) आषाढी एकादशी निमित्त आयोजित चित्र प्रदर्शन :

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी वॉटर कलर पोस्टर, पेन्सिल शेडिंग च्या माध्यमातून संतांची वारकऱ्यांची व्यक्तिचित्र साकारली. संतांचे अभंग अक्षर लेखनाच्या माध्यमातून मांडले. चित्रप्रदर्शनामध्ये चित्रांची कशाप्रकारे मांडणी केली जाते याचा अनुभव या प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळाला.

४) ७५ फूट लांबीचे सर्वात मोठे पोस्टर १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या औचित्य साधून विद्यार्थ्यांनी रंगवले. अतिशय कमी कालावधीत एवढे मोठे चित्र रंगवताना विद्यार्थ्यांनी सांघिक एकोपा दाखवत अवघ्या तीन तासांमध्ये ही भव्य कलाकृती पूर्ण केली. या कलाकृतीच्या माध्यमातून देशभक्ती, राष्ट्रप्रेम,एकात्मता, विविधतेतून एकता, बंधुभाव हे संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता आले ,

५)सप्टेंबर महिन्यात घेण्यात आलेला माती पासून मूषक बनवणे (माझा बाप्पा…माझा मूषक..) या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व समजावून सांगितले. आपल्या परिसरात मिळणारी माती वापरून विद्यार्थिनी सुंदर मूषक बनवले. त्याचबरोबर या मूषकांच्या हातामध्ये झाडे लावा झाडे जगवा, रक्तदान श्रेष्ठ दान असे सामाजिक संदेश देणारे फलकही देण्यात आले..

६) शालेय सरस्वती पूजन कार्यक्रमांतर्गत सरस्वती पुजनाची आरास करताना विद्यार्थ्यांनी कला शिक्षकांच्या मदतीने चांद्रयान ३ ची प्रतिकृती बनवली. आपल्या देशाने माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात केलेली प्रगती, अवकाश संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांची माहिती या माध्यमातून विद्यार्थ्यांना देण्यात आली ...

७) फेस पेंटिंग कार्यशाळा : या उपक्रमाच्या माध्यमातून आपले पर्यावरण व त्यातील प्राणी जीवन यांचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले त्याचबरोबर चेहरा रंगवण्यासाठी पर्यावरण पूरक रंगांचा कशाप्रकारे वापर करता येईल याचे मार्गदर्शन करण्यात आले.( या उपक्रमाची दखल वयम या मासिकानेही घेतली )

८) दीपावली निमित्त विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक साहित्यापासून आकाश कंदील बनवले. आपल्या सणसमारंभाची पर्यावरणाशी सांगड घालता यावी यासाठी या उपक्रमाची मदत झाली.

९) दिवाळी सुट्टीचा उपयोग करीत विद्यार्थ्यांनी कट्टा परिसरात असलेल्या सार्वजनिक बस स्टॉप वर साफसफाई केली,बस स्टॉपच्या भिंती विविध जाहिरातींच्या फाटलेल्या कागदामुळे विद्रूप झालेल्या होत्या. त्या भिंती स्वच्छ करत विद्यार्थ्यांनी त्यावर रंगरंगोटी केली व वृक्ष संवर्धन, प्लास्टिकचे दुष्परिणाम, व्यसनमुक्ती स्वच्छ भारत सुंदर भारत असे संदेश देणारी भीतीचित्र रंगवली.

.

## उपक्रमाची यशस्विता /फलनिष्पत्ती

१)विद्यार्थ्यांनी केल्या भिंती बोलक्या या उपक्रमामुळे शालेय परिसरसुंदर व आकर्षक बनला.

२)शाळेकडे पाहण्याचा पालकांचा दृष्टिकोन सकारात्मक झाला.

३)विद्यार्थ्यांनाही आपण या उपक्रमात सहभागी झाल्याचे समाधान मिळाले.

४)मुलांनी आपल्या शालेय सुट्टीचा उपयोग नवीन कौशल्य विकसित करण्यासाठी केल्यामुळे पालकांनी समाधान व्यक्त केले.

५) ग्रामीण भागात मराठी शाळांकडे होणारी विद्यार्थी गळती या उपक्रमामुळे काही प्रमाणात थांबली. शाळेमध्ये नवीन विद्यार्थी प्रवेश वाढण्यास मदत झाली.

६)मुलांना आपल्यातील कल्पकता, सृजनशीलता,नवनिर्मिती, एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती, आत्मविश्वास यांची नव्याने ओळख झाली.

७) कलेच्या माध्यमातून अर्थाजन होऊ शकते हे पालकांना समजले.

८) विद्यार्थ्यांनी सामाजिकतेचे भान राखत परिसरात रंगवलेल्या भित्ती चित्रांमुळे लोकांना वृक्ष संवर्धन, व्यसनाचे दुष्परिणाम,प्लास्टिकचे दुष्परिणाम सार्वजनिक स्वच्छता समजले.

९) कलाविषयक विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्पर्धा शासकीय रेखा कला परीक्षामध्ये विद्यार्थी यशस्वी झाले.

१०) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टिकोनातून कलाविषयक उपक्रम अध्ययन पुरक ठरले

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्राधिमान,देशप्रेम,सहकार्य वृत्ती, आपल्या पर्यावरणाविषयी जाणीव-जागृती, कलात्मक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली

## संदर्भ


Internet: https://images.app.goo.gl/FMP53ye7xZPzse5K6

YOUTUB: https://youtu.be/7gWqOMl3U9o?si=WIbPKkGbNzrmLjLb

https://youtu.be/IvRJM3Q9GTc?si=YbzatmkZ6WTCjS75


# समारोप

. शाळेला सुट्टी, शिकू नव्या गोष्टी... हा उपक्रम विद्यार्थ्यांना नवकल्पना देणारा ठरला. सुट्टीचा सदुपयोगनवीन कौशल्य विकसित करण्यासाठी होऊ शकतो या विद्यार्थ्यांच्या कृतीयुक्त शिक्षणासाठी पालकांनीहीसमाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांवर विश्वास दाखवल्यास विद्यार्थीही आपल्यातील कला कौशल्य विकसित करू शकतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात हे या उपक्रमाच्या माध्यमातून सिद्ध झाले. आनंददायी शिक्षण ही संकल्पना या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत सहज पोहोचवता आली.एक शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसाठी अशा वेगवेगळया उपक्रमांचे आयोजन करून मला ही.समाधान प्राप्त झाले. एकूण प्रवासात प्रशालेचे मुख्याध्यापक श्री संजय सुभाषनाईक यांचे सहकार्यव मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले

.या उपक्रमात इयत्ता आठवी, नववी, दहावी अकरावीचे विद्यार्थी सहभागी झाले.

विविध प्रसार माध्यमानी शाळेला सुट्टी शिकू नव्या गोष्टी या उपक्रमांतर्गत घेतलेल्या विविध उपक्रमांची घेतलेली दखल....

# वराडकर हायस्कुल येथे प्लेट पेंटिंग प्रदर्शन

**मसुरे (प्रतिनिधी):**



कट्टा येथील वराडकर हायस्कुल येथे प्लेट पेंटिंग प्रदर्शनाचे उदघाटन करताना विज... सुनील नाईक, दीपक भोगटे व अन्य मान्यवर (छाया : झुंजार पेडणेकर)

कट्टा येथील वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय या प्रशालेत प्लेट पेंटिंग प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले .या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी पोफळीच्या सालापासून तयार करण्यात आलेल्या डिनर प्लेटवर अक्रेलिक कलरच्या साहाय्याने सुंदर चित्रे काढली.त्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रातील विविध पक्षी ,लघुचित्रशैलीतील काही चित्रे देखावे अशा विविध कलाकृती रेखाटून या प्लेट अधिक आकर्षक बनवल्या .इयत्ता सातवी ,आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी या कलाकृती बनवल्या .यासाठी कलाशिक्षक श्री समीर चांदरकर यांनी मार्गदर्शन केले .

कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव श्रीमती विजयश्री देसाई, तसेच सचिव श्री सुनील नाईक, बॅरिस्टर नाथ पै सेवांगण शाखा कट्टाचे कार्याध्यक्ष श्री दीपक भोगटे यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले .तसेच कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय अजयराज वराडकर व सर्व संचालक मंडळ यांनी या उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या .प्रशालेचे मुख्याध्याप... के .कांबळे, ज्येष्ठ शिक्षक संजय नाईक, वराडकर इंग्लिश मीडियम स्कूल चे मुख्याध्यापक श्री नाईक सर., डॉ. दादासाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय प्राचार्य जमदाडे सर सर्व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

मंगळवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२३ टाइम्स

## शास्त्रीय गायनात मुलांमध्ये सुमन गोसावी तर मुलींमधून स्वरांगी पाटील प्रथम

## विद्यार्थ्यांची होणार मूल्यमापन चाचणी

## एटीएस उपनिरीक्ष... कुबल यांचे आक...





कट्टा : वराडकर हायस्कूल येथे सरस्वती पूजनानिमित चांद्रयान-३ मोहिमेची साकारलेली प्रतिकृती लक्षवेधी ठरली.

## कट्टा वराडकर हायस्कूलमध्ये साकारला 'चांद्रयान' देखावा

**मालवण :** कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ कट्टा संचालित वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय या प्रशालेत सरस्वती पूजन कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांच्या मनात चांद्रयान-३ विषयी अधिक माहिती मिळावी, या उद्देशाने चांद्रयान ३ बनविणारे शास्त्रज्ञ, प्रत्यक्ष चांद्रयान, विक्रम लँडर, प्रज्ञान रोव्हर यांची पर्यावरणपूरक साहित्यापासून साकारण्यात आलेली प्रतिकृती लक्षवेधी ठरली. कलाशिक्षक समीर चांदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी ही प्रतिकृती साकारली. कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अजयराज वराडकर, उपाध्यक्ष आनंद वराडकर, शेखर पेणकर, सचिव सुनील नाईक, सचिव विजयश्री देसाई व सर्व संचालक मंडळ, शालेय समिती अध्यक्ष सुधीर वराडकर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. प्रशालेचे मुख्याध्यापक संजय नाईक, शालेय संसद उपाधिपती किसन हडलगेकर, शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

लोकमत

## आय फिटनेस | विद्यार्थ्यांनी मानवी अक्षर लेखनातून दिल्या योगदिनाच्या शुभेच्छा!




२१ जून रोजी होणाऱ्या जागतिक योग दिनाच्या पार्श्वभूमीवर मालवण कट्टा येथील वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मानवी अक्षर लेखनाच्या माध्यमातून (WORLD YOGA DAY) ही अक्षरे साकारत आगळ्यावेगळ्या पध्दतीने शुभेच्छा दिल्या. यावेळी मैदानावर प्रशालेचे मुख्याध्यापक संजय नाईक, पर्यवेक्षिका देवयानी गावडे, क्रीडाशिक्षक संजय पेंडुरकर, रामकृष्ण सावंत, किसन हडलगेकर, महेश भाट, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. समीर चांदरकर व भूषण गावडे यांच्या संकल्पनेतून ही अक्षर कलाकृती साकारली गेली. (छाया : अमोल गोसावी)

Hello Sindhudurg
Page No. 2 Jun 21, 2023
Powered by: erelego.com

# अन् विद्यार्थ्यांनी शाळेच्या भिंती बोलक्या केल्या!

## वराडकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा कलाविष्कार : सामाजिक संदेश देणारी पोस्टर्स भिंतीवर रंगविली

वार्ताहर
कट्टा

दोन वर्षे कोरोनामुळे बंद असलेली ज्ञानाची मंदिरे आता पुन्हा खुली झाली आहेत. अन् विद्यार्थ्यांच्या आवाजाने ही ज्ञान मंदिरे खुलून गेली आहेत. याचाच प्रत्यय मालवण तालुक्यातील कट्टा येथील वराडकर हायस्कूल येथे आला. मुले शाळेत आली आणि परिसर पाहून भारावूनच गेली. तो क्षण होता, शाळेचा पहिला दिवस.

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातला महत्वाचा टप्पा म्हणजे त्याचे शालेय जीवन. परंतु कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे गेली दोन वर्षे मुलांची नियमित शाळा होऊ शकली नाही. दरवर्षी १५ जूनला शाळा सुरू होते. परंतु गेल्या दोन वर्षांत तो आनंदाचा क्षण मुलांच्या वाट्याला आला नाही. मात्र, या वर्षी १५ जूनला राज्यातील सर्व शाळा सुरू होणार हे जाहीर झाल्यानंतर सर्व शाळांमध्ये मुले आनंदाने, उत्साहाने गेली. शिक्षकांनी मुलांचा हाच उत्साह कायम ठेवण्यासाठी अगोदरच जोरदार तयारी केली.

मालवण तालुक्यातील कट्टा येथील वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाने आपला शालेय परिसर सुशोभीकरणाचे काम हाती घेतले. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक संजय नाईक यांनी पुढाकार घेतला. प्रशालेचे कला शिक्षक समीर चांदरकर याच्या मार्गदर्शनाखाली





कट्टा : वराडकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी अशा पद्धतीने शालेय भिंती बोलक्या केल्या.

शाळेतील इयत्ता आठवी, नववी व दहावीचे विद्यार्थी प्रतिक्षा मेस्त्री, सिद्धाली पांचाळ, सानिया कुडतरकर, मिथील आंगचेकर, श्रेया चांदरकर, रुची ढोलम, पूर्वा मेस्त्री, पूर्वा चांदरकर, रश्मी पांचाळ, माजी विद्यार्थी आकाश बिरमोळे, राहुल जाधव, प्रसाद मेस्त्री, वेदांत पोटफोडे यांनी शाळेच्या दर्शनी भिंतीवर वेगवेगळे सामाजिक संदेश देणारी पोस्टर्स रंगविली. या कामात विद्यार्थ्यांचा सहभाग महत्वाचा होता. उत्साहाने भिंतींवर ॲक्रेलिक कलरचा वापर करून या चित्रांमध्ये मुलांनी जीव ओतला. मुलींचे शिक्षण, योगाचे जीवनातील महत्व, धूम्रपानाचे दुष्परिणाम, पुस्तकांशी मैत्री, देशाभिमान असे सामाजिक संदेश देणारी पोस्टर्स विद्यार्थ्यांनी शालेय आवारातील भिंतीवर रंगविली अन् शाळेच्या भिंती मुलांनी बोलक्या केल्या.

मे महिन्याच्या सुट्टीचा योग्य वापर करत मुलांनी कलात्मक वृत्ती जोपासली. बऱ्याच वेळा असे रंगकाम प्रोफेशनल् माणसांकडूनच करून घेतले जाते. परंतु या चित्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी त्यांच्यावर शिक्षकांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरविला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कलाकृतीसाठी कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अजयराज वराडकर, शालेय समिती अध्यक्ष सुधीर वराडकर व सर्व संचालक मंडळाने विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शाळेच्या पहिल्या दिवशी दोन वर्षांनी जुने व नवीन विद्यार्थी शाळेत प्रवेशित झाले. त्यावेळी शाळेत झालेले त्यांचे स्वागत शाळेचा बदललेला चेहरा-मोहरा पाहून विद्यार्थी भारावून गेले.

## राष्ट्रीय कला उत्सव; प्रतीक्षा मेस्त्री, पूर्वा चांदरकरच्या कौशल्याला दाद

# 'वराडकर'ची भुवनेश्वरमध्ये चमक

ओरोस, ता. ११ : भुवनेश्वर-ओडिसा येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील कला उत्सव स्पर्धेत मालवण तालुक्यातील कट्टा येथील वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलांनी सहभाग घेतला. यात प्रतीक्षा मेस्त्री हिने खेळणी बनविणे या कला प्रकारात, तर पूर्वा चांदरकर हिने नाट्य या कला प्रकारात सहभाग नोंदविला. या विद्यार्थिनींनी कला व अभिनय कौशल्याने परीक्षकांची वाहवा मिळवली. एकाच प्रशालेतून दोन विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेली वराडकर हायस्कूल ही एकमेव प्रशाला ठरली.



भुवनेश्वर : राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी वराडकर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या मुलांसोबत महाराष्ट्रातील अन्य सहभागी मुले.

माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील प्रतिभा ओळखून त्यांच्यामधील कलागुणांना वाव देण्यासाठी शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्यामार्फत २०१५-१६ पासून कला उत्सवाचे दरवर्षी आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये देशातील सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेश सहभाग नोंदवितात. २०२२-२३ मध्ये झालेल्या राष्ट्रीय स्तरावरच्या कला उत्सव स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वीस विद्यार्थ्यांमध्ये वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टाच्या दोन विद्यार्थिनींचा समावेश होता. प्रतीक्षा मेस्त्री हिने खेळणी बनविणे या कला प्रकारात तसेच पूर्वा चांदरकर हिने नाट्य या कला प्रकारात राज्यस्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला होता. त्यामुळे या दोघींचा राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग झाला होता. दरम्यान, या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक समीर चांदरकर यांनी मार्गदर्शन केले. ओडिसा येथे झालेल्या स्पर्धेत या विद्यार्थ्यांसोबत एससीआरटी पुणे येथील वैशाली गाढवे व धनंजय क्षीरसागर समन्वयक म्हणून उपस्थित होते. ओडिसाच्या शिक्षण मंत्री अन्नपूर्णा देवी, राज्यमंत्री सुभाष सरकार, केंद्रीय परराष्ट्र व शिक्षा मंत्री राजकुमार राजनाथ सिंग आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा झाला. कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त कर्नल शिवानंद वराडकर, अॅड. एस. एस. पवार, अध्यक्ष अजयराज वराडकर, उपाध्यक्ष आनंद वराडकर, शेखर पेणकर, सचिव सुनील नाईक, विजयश्री देसाई, साबाजी गावडे, खजिनदार रवींद्रनाथ पावसकर, शालेय समिती अध्यक्ष सुधीर वराडकर, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष अनिल फणसेकर, मुख्याध्यापक संजय नाईक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### दोन विद्यार्थ्यांची निवड कौतुकास्पद

■ २ ते ७ जानेवारी दरम्यान ओडिसा-भुवनेश्वर इथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टाच्या या दोन विद्यार्थिनींनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना आपल्या कला व अभिनय कौशल्याने परीक्षकांची वाहवा मिळवली. एकाच प्रशालेतून दोन विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेली वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टा ही एकमेव प्रशाला ठरली.

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED
शब्दांना सत्याची धार
प्रहार

# हस्तकला, चित्रकला, मातीकाम, पारंपरिक खेळ, गीतगायनाचा मुलांनी घेतला आनंद

## बॅ. नाथ पै सेवांगण कट्टाच्या 'सुट्टीतील मजा' शिबीराचा उत्साहात समारोप

मसुरे (प्रतिनिधी):

सेवांगण कट्टा शाखेच्या वतीने ६ दिवस संपन्न झालेल्या लहान मुलांच्या शिबीराचा समारोप कला शिक्षक समीर चांदरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

हस्तकला, कागद काम, चित्रकला, मातीकाम, पारंपरिक खेळ, गीत गायन अशा विविध उपक्रमांचा आनंद मुलांनी घेतला.

अत्यंत आनंददायी आणि खूप उत्साहवर्धक शिबीर संपन्न झाले. अन त्याचा भाग मला होता आले याचा फार आनंद वाटतो, असे कला शिक्षक समीर चांदरकर या वेळी म्हणाले. अॅड. समृद्धी म्हाडगुत म्हणाल्या, या शिबीरात मुलांना मनोरंजना सोबत अनेक अनोख्या खेळांचा गीतांचा परिचय झाला. या बद्दल त्यांनी सेवांगणला धन्यवाद दिले.

प्रारंभी दीपक भोगटे यांनी या शिबीराची संकल्पना व सहकार्य केलेल्या सर्व शिक्षकांचे आभार मानले. बाळकृष्ण नांदोसकर यांनी पालकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी या शिबीरात मार्गदर्शन केलेल्या समीर चांदरकर, बाळ वाईरकर, मनोज काळसेकर, नम्रता पावसकर, विजयालक्ष्मी डगरे, वीणा म्हाडगुत, नम्रता पावसकर, सुवर्णा शिरोडकर यांचा सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सेवांगण परिवारातील सेवानिवृत्त शिक्षका डगरे मॅडम यांचा शाल श्रीफळ देऊन खास सत्कार करण्यात आला. दुर्वा नाईक, सोहम मसूरकर, तनिषा म्हाडगुत, मधुर पेंडूरकर, खुशी वाईरकर, जय हडकर, पराग महाभोज, मिथील गुराम यांनी सुंदर कथा सांगितल्या. श्लोक चांदरकर याने आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन वैष्णवी लाड यांनी केले. सहभागी मुलाना प्रशस्तीपत्र देण्यात आले. या समारंभास किशोर शिरोडकर, बापू तळावडेकर, प्रियांका भोगटे, पालक व मुले उपस्थित होते.



कट्टा येथे लहान मुलांच्या शिबिराच्या समारोप कार्यक्रम प्रसंगी उपस्थित दीपक भोगटे, बाळकृष्ण नांदोसकर व अन्य
(छाया : झुंजार पेडणेकर)



# 'चित्ताकर्षक' उपक्रम

**एकमेकांच्या** चेहऱ्याला रंग लावण्याचा उद्योग करायला मुलांना जाम आवडते. मध्यंतरी आमच्या वराडकर हायस्कूल (कट्टा- ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) या प्रशालेत चेहरा रंगविणे (फेस पेंटिंग) हा उपक्रम घेण्यात आला.

सप्टेंबरमध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनी नामिबियाच्या जंगलातून आठ चित्ते भारतात मध्य प्रदेशातील कुनो अभयारण्यात आणण्यात आले. चित्त्यांविषयी मुलांच्या मनात कुतूहल होतेच. म्हणून आम्ही चेहरा रंगविणे (फेस पेंटिंग) या कार्यशाळेचे आयोजन करण्याचे ठरवले. या उपक्रमाचा मुलांना प्रत्यक्ष अनुभव घेता यावा यासाठी आमच्या प्रशालेतील हरहुन्नरी कलाकार कुमार द्वितीज दशरथ गवाणकर (दहावी) या विद्यार्थ्याची निवड करण्यात आली.

द्वितीज गेल्या तीन वर्षांपासून या प्रशालेत शिकतो आहे. तो थॅलेसेमिया या आजाराने त्रस्त आहे. वयाच्या तिसऱ्या वर्षीपासून आजपर्यंत, दर पंधरा दिवसांनी त्याच्या शरीरात नवीन रक्त चढवावे लागते. त्याच्या शरीरातील रक्ताची कमतरता भरून काढण्यासाठी हा उपचार तो घेतो. त्याबद्दल तो सहजपणे सांगतो- जसे आपण पेट्रोलचे एखादे चालवतो आणि पेट्रोल संपले की पुन्हा भरतो, तसंच! त्याच्या या उत्तराने ऐकणारा काही क्षण स्तब्ध होतो!

त्याच्या शरीरात रक्ताची कमतरता जशी वाढते तसा थकवाही वाढतो, डोळ्यांना सूज येते. या समस्यांचा तो बाऊ करत नाही. द्वितीज हा उत्कृष्ट रंगकर्मी आहे. कोकणातील पारंपरिक कलाप्रकार दशावतार त्याने अगदी लहानपणापासून आत्मसात केले आहेत. तो उत्कृष्ट रंगभूषाकार (मेकअप आर्टिस्ट) आहे. शिवाय तो अभिनयातून एखादी व्यक्तिरेखा अक्षरशः जिवंत करतो. त्याची संवादफेक खास आहे. त्याला हार्मोनियम वादन, संबळ वादन, गायन, चित्रकला यांचीही आवड आहे.

अलीकडेच या प्रशालेत विज्ञान नाटिकेचे आयोजन करण्यात आले होते. या नाटिकेत द्वितीजने 'करोना'सुराची उत्कृष्ट भूमिका करीत सर्व प्रेक्षकांची वाहवा मिळवली. यात त्याने स्वतःचा मेकअप स्वतः केला. त्याच्या याच कौशल्याचा वापर फेस पेंटिंग कार्यशाळेच्या माध्यमातून करून घेण्याचे शाळेने ठरवले.

आता चेहरे रंगवताना चेहऱ्यावर केमिकलयुक्त रंग वापरणे मुलांसाठी हानिकारक होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यात दशावतार नाट्यकलेतील पात्र ज्या पद्धतीने नैसर्गिक रंगांचा वापर करून चेहरे रंगवतात, त्याच पद्धतीचा वापर या ठिकाणी करण्याचे ठरवले. ममता आंगचेकर, अनिरुद्ध गायकवाड, श्रेया चांदरकर या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मेकअप करण्याचा अनुभव घेतला. स्वतःचा चेहरा रंगवून घेण्यासाठी इयत्ता पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांचा उत्साह कमालीचा होता. मात्र आठच विद्यार्थ्यांचे प्रातिनिधीक स्वरूपात चित्त्यांच्या रूपातील मुखवटे रंगविण्यात आले. यासाठी कलाशिक्षक समीर अशोक चांदरकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच साहाय्यक शिक्षक भूषण गावडे यांनीही मदत केली.

मग चित्त्यांच्या मुखवट्याने रंगलेल्या विद्यार्थ्यांनी प्रत्येक वर्गात जाऊन प्रश्नोत्तराद्वारे चित्त्यांची माहिती वर्गातील मुलांना विचारली. मुलांनीही उत्स्फूर्तपणे उत्तरे दिली.

हा रंगतदार उपक्रम छानच रंगला!

-मेघना जोशी
*joshimeghana.23@gmail.com*
(साहित्यिक)



# पुण्यातील कला उत्सवात 'वराडकर'चा दबदबा

## विविध कलांचे सादरीकरण; रंगभूषा, वेशभूषा, दशावताराचा समावेश

मालवण, ता. २९ : पं. भीमसेन जोशी कलादालन पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय कला उत्सव स्पर्धेत कट्टा (ता.मालवण) येथील वराडकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा सहभाग हा केवळ नाममात्र औपचारिकता न रहाता त्या सहभागाची संपूर्ण राज्यभर प्रशंसा होत आहे. पारंपरिक गायन, तालवाद्य वादन, शास्त्रीय नृत्य, नाट्य, द्विमित चित्र, त्रिमित शिल्प, खेळणी बनविणे अशा विविध कला प्रकारांमध्ये नऊ विद्यार्थी सहभागी झाले होते. एवढ्या मोठ्या संख्येने राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणारे वराडकर हायस्कूल एकमेव ठरले.



पुणे : येथील कला उत्सवात सहभागी झालेले कट्टा येथील वराडकर हायस्कूलचे विद्यार्थी.

भरतनाट्यम नृत्य सादर करत ग्रामीण भागातील विद्यार्थीही कोणापेक्षा कमी नाहीत याची प्रचिती साक्षी नाईक हिने दिली. 'वसुंधरा वाचवा व पर्यावरणाचे रक्षण करा' हा संदेश देणारे द्विमित चित्र रिया भगत हिने साकारले. अवधूत आचरेकरने त्रिमित शिल्पाच्या माध्यमातून हा संदेश दिला. मुलींच्या शिक्षणाबाबतची जागरुकता निर्माण करणारे शिल्प ममता आंगचेकरने साकारले. राजमाता जिजाऊ यांची व्यक्तिरेखा पूर्वा चांदेकर हिने साकारत रसिकमनाचा ठाव घेतला. या सर्व टीमचे मार्गदर्शक व व्यवस्थापक म्हणून कला शिक्षक समीर चांदरकर, सहाय्यक शिक्षक भूषण गावडे तसेच राजन पेंडूरकर यांनी सहकार्य केले. पुण्यासारख्या शहरातील तीन दिवसांच्या दहा मंडळींची निवासाची सोय मुख्याध्यापक नाईक यांचे आतेभाऊ विनय मांजरेकर, त्यांची पत्नी सृष्टी यांनी केली. कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ कट्टाचे अध्यक्ष अजयराज वराडकर, उपाध्यक्ष आनंद वराडकर, सचिव सुनील नाईक, विजयश्री देसाई, शालेय समिती अध्यक्ष सुधीर वराडकर, मुख्याध्यापक संजय नाईक यांचे सहकार्य लाभले.

### प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यांच्या कलाकृती

या स्पर्धेत प्रतिभासंपन्न असलेल्या विद्यार्थ्यांनी मनमोहक कलाकृती सादर केल्या. स्वतःच्या स्वतः रंगभूषा, वेशभूषा करत अभिनयस्तरावर सर्वांना चकीत केले. लक्ष वेधून घेणारा गरुडाच्या वेशभूषेतील द्वितीज गवाणकर हा विद्यार्थी आकर्षणाचा केंद्र ठरला. गायक पार्थ नलावडे, पखवाज वादक ओंकार राऊळ, झांज वादक अवधूत आचरेकर या सर्वांनी सुंदर साथ देत दशावतार पारंपरिक कला तसेच पारंपरिक अभंग गायन, वादन या सर्वच बाबतीत रसिकांची मने जिंकली.

■ नऊ विद्यार्थी राज्यस्तरीय स्पर्धेस पात्र

# कला उत्सव २०२२ मध्ये वराडकर हायस्कूलचे यश !

**कोकणसाद वृत्तसेवा**



**राज्यस्तरीय कला उत्सव स्पर्धेसाठी पात्र ठरलेले वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी. सोबत शिक्षक वर्ग व इतर मान्यवर.**

**सिंधुदुर्ग :** कला उत्सव २०२२ मध्ये वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कट्टाने वर्चस्व राखले असून राज्यस्तरीय कला उत्सव स्पर्धेसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवडलेल्या १५ स्पर्धकांपैकी नऊ स्पर्धक वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे आहेत.

माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील प्रतिभा ओळखून त्यांच्यामधील कलागुणांना वाव देण्यासाठी शालेय शिक्षण व साक्षरता विभाग शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्यामार्फत सन २०१५-१६ पासून कला उत्सवाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. यामध्ये देशातील सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेश आपला सहभाग नोंदवतात. यामध्ये शास्त्रीय गायन, पारंपरिक गायन, ताल वाद्यवादन, शास्त्रीय नृत्य, पारंपरिक लोकनृत्य, द्विमितीय चित्र, त्रिमितीय शिल्प, खेळणी तयार करणे व नाट्य या दहा कला प्रकारांचा समावेश केलेला आहे.

जिल्हास्तरावर झालेल्या कला उत्सव स्पर्धेमध्ये वराडकर हायस्कूल, कट्टाचे विद्यार्थी रिया विशेष भगत, इयत्ता नववी (द्विमित चित्र) प्रतीक्षा नीलकंठ मेस्त्री, इयत्ता अकरावी (खेळणी बनवणे), वैभव अवधूत आचरेकर, इयत्ता अकरावी (त्रिमित शिल्प), ममता महेश आंगेकर, इयत्ता नववी (त्रिमित शिल्प) साक्षी रवींद्र नाईक, इयत्ता नववी (शास्त्रीय नृत्य भरतनाट्यम) पूर्वा रामदास चांदरकर, इयत्ता दहावी (नाट्य), द्वितीज दशरथ गव्हाणकर, इयत्ता दहावी (नाट्य), पार्थ गणेश नलावडे, इयत्ता नववी (पारंपरिक गायन) ओमकार मोहन राऊळ, इयत्ता बारावी (वादन) हे विद्यार्थी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले.

या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक समीर अशोक चांदरकर यांनी मार्गदर्शन केले. या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसार मंडळाचे अध्यक्ष अजयराज वराडकर, सल्लागार शिवानंद वराडकर, सचिव श्रीमती विजयश्री देसाई, शालेय समिती अध्यक्ष सुधीर वराडकर, प्रमुख पाहुणे सिंधुदुर्ग ॲडव्हेंचर क्लबचे कमलेश चव्हाण, वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक संजय नाईक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

सकाळ

# बांद्यात रांगोळी प्रदर्शनातून सामाजिक संदेश

## गांधी चौक मंडळाचा पुढाकार : विविध विषयांवरील रांगोळ्या ठरल्या लक्षवेधी

**सकाळ वृत्तसेवा**

बांदा, ता. ५ : रांगोळीतून वास्तवतेचा आभास आणि सामाजिक संदेश देण्याचा उपक्रम बांदा येथील विठ्ठल मंदिर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ गांधीचौक मंडळाने राबवला. या उपक्रमात जिल्ह्यातील प्रसिद्ध रांगोळी कलाकारांनी एकापेक्षा एक सरस व सामाजिक संदेश देत काढलेल्या रांगोळ्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरल्या.

या रांगोळी प्रदर्शनात गणेशाच्या मूर्तींची प्रतिमा साकारली आहे. तर अनेक राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त कलाकार समीर चांदरकर यांनी ''चाकरमान्यांची वाट पाहणारी



**बांदा : रांगोळी प्रदर्शनात 'चाकरमान्यांची वाट पाहणारी माता' आकर्षण ठरली.**

माता'', ''झाली तयारी बाप्पाच्या आगमनाची'', ''आतुरलेले डोळे पाहती वाट चाकरमान्यांची'' या कलाकृती रांगोळीतून साकारताना वास्तवता विशद केली आहे. तर ऑन ड्युटी असणाऱ्या पोलिसांच्या मनातील भाव ''बाप्पा आला दारी, तरी आम्ही नाही आमच्या घरी'' या रांगोळीतून केदार टेमकर याने साकारत पोलिस कर्मचाऱ्यांच्या मनातील वेदना मांडली आहे.

सिद्धेश धुरी याने ''चौसष्ट कलांचा, चौदा विद्यांचा अधिपती'' हा आविष्कार साकारत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. लहान मुलगी आपल्या लाडक्या बाप्पाकडे मोदकाची मागणी करणारी रांगोळी श्रेया चांदरकर हिने ''दे ना बाप्पा, दे ना मोदक मला!'' यातून साकारली आहे. पर्यावरणाचा संदेश देत मातीचा बाप्पा पूजण्याचा पर्यावरण संदेश ''बाप्पा माझा मातीचा, पर्यावरणाच्या साथीचा'' या रांगोळीतून गौरेश राऊळ याने दिला आहे. सायली भैरे हिने ''तूच करता आणि करविता'' ही अप्रतिम रांगोळी साकारली आहे. गणेशोत्सवानंतर गणेश विसर्जनाच्या वेळी लहान मुलांच्या मनातील भाव ''बाप्पा चालले आपल्या गावाला, चैन पडेना आमुच्या मनाला'' या रांगोळीतून पूर्वा चांदरकरने साकारले असून या सर्वच रांगोळ्या प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहेत. या रांगोळ्या पाहण्यासाठी बांदा शहर तसेच गोव्यातून व ग्रामीण भागातून भाविक मोठ्या प्रमाणात गर्दी करत आहेत.

Sindhudurg, Main
06/09/2022 Page No. 2

# नवनिर्वाचित राष्ट्रपतींना रांगोळीच्या माध्यमातून दिल्या शुभेच्छा!




वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयय कट्टा या प्रशालेतील कलाशिक्षक श्री. समीर चांदरकर व प्रशालेतील विद्यार्थिनी श्रेया चांदरकर, रिया भगत, ममता आंगचेकर या विद्यार्थ्यांनी मिळून नवनिर्वाचित राष्ट्रपती श्रीमती द्रोपदी मुर्मु यांची साकारलेली रांगोळी लक्षवेधी ठरत आहे. रांगोळीच्या माध्यमातून दिलेल्या शुभेच्छा बद्दल कौतुक होत आहे. यासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक संजय नाईक यांनी मार्गदर्शन केले तसेच कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अजयराज वराडकर व सर्व संचालक मंडळ यांनी शुभेच्छा दिल्या.

---

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED
शब्दांना सत्याची धार
प्रहार

# विद्यार्थ्यांनी बनविले पर्यावरणपूरक नागोबा



कट्टा येथे वराडकर हायस्कुलच्या विद्यार्थ्यांनी बनविलेले पर्यावरण पूरक नागोबा ( छाया : झुंजार पेडणेकर )

**मसुरे (प्रतिनिधी)**

श्रावण महिन्यात नागपंचमीच्या सणालाही फार महत्त्व आहे त्यानिमित्त घराघरात मातीच्या नागोबाची पूजा केली जाते. कट्टा येथील वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय या प्रशालेतील कला विषय समिती मार्फत पर्यावरण पूरक मातीचे नागोबा बनवण्याचा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमांतर्गत मुलांनी स्वतः साच्याचा वापर करून स्थानिक भागात मिळणाऱ्या मातीपासून आकर्षक नागोबा बनविले. रंगकाम सुद्धा मुलांनी स्वतः केले. स्वनिर्मितीच्या आनंदा बरोबरच पर्यावरणाचे रक्षण आणि आपल्या समृद्ध परंपरेचा वारसा जपण्याचे मोलाचे कार्य या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांनी केले. या उपक्रमासाठी कलाशिक्षक श्री. समीर चांदरकर यांनी मार्गदर्शन केले तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक श्री संजय नाईक यांनी मुलांना प्रोत्साहन दिले.

भारतीय सण, उत्सव व परंपरेला पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने ही महत्व आहे. यामाध्यमातून पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करणे हा ही संदेश दिला जातो. सणांच्या माध्यमातून पर्यावरण रक्षण हाही प्रमुख हेतू असतो.

निसर्गाला किंवा पर्यावरणाला अनुसरूनच सर्व धर्मांचे सण, उत्सव व परंपरा आहेत.

सध्या गरज आहे सगळे सण हे निसर्गपूरक किंवा पर्यावरणपूरक कश्या पध्दतीने साजरे होतील हे पाहण्याची. त्यादृष्टीने जनजागृती होणे महत्वाचे आहे असे यावेळी समीर चांदरकर म्हणाले.

कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ कट्टाचे अध्यक्ष श्री अजयराज शरद वराडकर उपाध्यक्ष श्री.आनंद वराडकर, सचिव श्री.सुनील नाईक, श्रीमती. विजयश्री देसाई, शालेय समिती अध्यक्ष श्री. सुधीर वराडकर व सर्व संचालक मंडळ यांनी कौतुक केले.

Sindhudurg Edition
Aug, 02 2022 Page No, 3

# रंगरेषांनी झाल्या शाळेच्या भिंती बोलक्या!

## विद्यार्थ्यांचा उपक्रम; कट्टा हायस्कूलमध्ये सामाजिक संदेश देणारी चित्रे

**ओरोस, ता. १४ :** तब्बल दोन वर्षांनंतर शैक्षणिक वर्ष नियमित वेळेत काल (ता. १३) सुरू झाले. तर उद्या (ता. १५) विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत बसणार आहेत. कोरोनामुळे शाळेच्या पहिल्या दिवसाचा आनंद मुलांना घेता आला नव्हता. यंदा तो मिळणार आहे; मात्र, हा आनंद अधिक द्विगुणित करण्याचा प्रयत्न कट्टा (ता. मालवण) येथील वराडकर हायस्कूलच्या मुलांनी केला आहे. आठवी ते दहावीतील चित्रकलेची आवड असलेल्या विद्यार्थ्यांनी शाळा सुरू होण्यापूर्वी चक्क शाळेच्या भिंती विविध संदेश देणारी चित्रे काढून बोलक्या केल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

दरवर्षी १५ जूनला शाळा सुरू होते. परंतु, कोरोनामुळे दोन वर्षांत तो आनंदाचा क्षण मुलांच्या वाट्याला आला नाही. मात्र, उद्या महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये मुले शाळेची पायरी अगदी आनंदाने उत्साहाने चढणार आहेत. मुलांचा हाच आनंद उत्साह कायम ठेवण्यासाठी वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टामध्ये शालेय परिसर सुशोभीकरणाचे काम हाती घेतले आहे.

यासाठी मुख्याध्यापक संजय नाईक यांनी पुढाकार घेतला आहे. प्रशालेचे कला शिक्षक समीर चांदरकर याच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील आठवी, नववी व दहावीचे विद्यार्थी प्रतीक्षा मेस्त्री, सिद्धाली पांचाळ, सानिया कुडतरकर, मिथिल आंगचेकर, श्रेया चांदरकर, रुची ढोलम, पूर्वा मेस्त्री, पूर्वा चांदरकर, रश्मी पांचाळ, माजी विद्यार्थी आकाश बिरमोळे, राहुल जाधव, प्रसाद मेस्त्री, वेदांत पोटफोडे यांनी शाळेच्या दर्शनी भिंतीवर वेगवेगळे सामाजिक संदेश देणारी पोस्टर रंगविली आहेत. विद्यार्थ्यांनी उत्साहाने भिंतींवर ॲक्रीलिक कलरचा वापर करून या चित्रांमध्ये विद्यार्थ्यांनी जीव ओतला आहे. यात मुलींचे शिक्षण, योगाचे जीवनातील महत्त्व, पर्यावरण संवर्धन, मोबाईलचे दुष्परिणाम, धूम्रपानाचे दुष्परिणाम, पुस्तकांशी मैत्री, देशाभिमान असे सामाजिक संदेश देणारी पोस्टर्स आहेत. शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अजयराज वराडकर, शालेय समिती अध्यक्ष सुधीर वराडकर आदींनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

### विद्यार्थ्यांच्या कलेचे कौतुक

आपल्या मे महिन्याच्या सुटीचा योग्य वापर करत मुलांनी कलात्मक वृत्तीला जोपासले आहे. बऱ्याच वेळा असे रंगकाम व्यावसायिक चित्रकार असलेल्या माणसांकडूनच करून घेतले जाते. परंतु, या चित्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी त्यांच्यावर दाखवलेला विश्वास सार्थ करून दाखवला.







**कट्टा : वराडकर हायस्कूलच्या भिंतीवर रेखाटलेली सामाजिक संदेश देणारी चित्रे.**

---

शब्दांना सत्याची धार
प्रहार

# ...अन शाळेच्या भिंती झाल्या बोलक्या!

## वराडकर हायस्कूल कट्टाच्या विद्यार्थ्यांचे होतेय कौतुक

झुंजार पेडणेकर(मसुरे)

विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलांना योग्य मार्गदर्शन लाभल्यास निश्चितच काहीतरी अनुकरणीय, इतरांना मार्गदर्शक बाबी घडतात. कट्टा येथील वराडकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या दर्शनी भिंतीवर रंगविलेल्या वेगवेगळ्या सामाजिक संदेश देणाऱ्या पोस्टर मधून याचाच प्रत्यय येत आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात महत्त्वाचा टप्पा म्हणजे शालेय जीवन. परंतु कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे गेली दोन वर्ष मुलांची नियमित शाळा होऊ शकली नाही. दरवर्षी १५ जूनला शाळा सुरु होते परंतु मागील दोन वर्षात तो आनंदाचा क्षण मुलांच्या वाट्याला आला नाही. मात्र १५ जूनला महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये मुले शाळेची पायरी अगदी आनंदाने उत्साहाने चढणार आहेत. मुलांचा हाच आनंद उत्साह कायम ठेवण्यासाठी वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कट्टा मध्ये शालेय परिसर सुशोभीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. संजय सुभाष नाईक यांनी पुढाकार घेतला. प्रशालेचे कला शिक्षक श्री. समीर चांदरकर याच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील इयत्ता आठवी, नववी व दहावीचे विद्यार्थी प्रतिक्षा मेस्त्री, सिद्धाली पांचाळ, सानिया कुडतरकर, मिथिल आंगचेकर, श्रेया चांदरकर, रुची ढोलम, पूर्वा मेस्त्री, पूर्वा चांदरकर, रश्मी पांचाळ, माजी विद्यार्थी आकाश बिरमोळे, राहुल जाधव, प्रसाद मेस्त्री, वेदांत पोटफोडे यांनी शाळेच्या दर्शनी भिंतीवर वेगवेगळे सामाजिक संदेश देणारी पोस्टर रंगविली आहेत. या कामात विद्यार्थ्यांचा सहभाग हा महत्त्वाचा होता. अतिशय उत्साहाने भिंतींवर ॲक्रीलिक कलरचा वापर करून या चित्रांमध्ये विद्यार्थ्यांनी जीव ओतला आहे. मुलींचे शिक्षण, योगाचे आपल्या जीवनातील महत्त्व, पर्यावरण संवर्धन, मोबाईलचे दुष्परिणाम, धुम्रपानाचे दुष्परिणाम, पुस्तकांशी मैत्री, देशाभिमान असे सामाजिक संदेश देणारी पोस्टर्स विद्यार्थ्यांनी शालेय आवारातील भिंतीवर रंगविली. आपल्या मे महिन्याच्या सुट्टीचा योग्य वापर करत मुलांनी कलात्मक वृत्तीला जोपासले. बऱ्याच वेळा असे रंगकाम व्यावसायिक माणसांकडूनच करून घेतले जाते. परंतु या चित्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी त्यांच्यावर दाखवलेला विश्वास सार्थ करून दाखवला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कलाकृतींसाठी कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अजयराज वराडकर, शालेय समिती अध्यक्ष श्री. सुधीर वराडकर व सर्व संचालक मंडळ यांनी विद्यार्थ्यांना व मार्गदर्शक शिक्षक समीर चांदरकर यांना शुभेच्छा दिल्या आहेत.





शाळेच्या दर्शनी भिंतीवर पोस्टर रंगवताना विद्यार्थी. तर विविध संदेश देणारी पोस्टर (छाया: झुंजार पेडणेकर).

Sindhudurg Edition
Jun, 14 2022 Page No, 3



कट्टा येथील वराडकर हायस्कुलमध्ये आयोजित प्लेट पेंटिंग प्रदर्शनात विद्यार्थ्यांसमवेत दीपक भोगटे, विजयश्री देसाई, सुनील नाईक, संजय नाईक व अन्य. तर दुसऱ्या छायाचित्रात विद्यार्थ्यांनी प्लेट वर साकारलेल्या विविध कलाकृती.

# प्लेट पेंटिंग प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांच्या कलेला वाव

मालवण, ८ मे (प्रतिनिधी) - महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून कट्टा येथील वराडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय या प्रशालेत प्लेट पेंटिंग प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी पोफळीच्या सालापासून तयार करण्यात आलेल्या डिनर प्लेटवर ॲक्रेलिक कलरच्या साहाय्याने सुंदर चित्रे काढली, त्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रातील विविध पक्षी, लघुचित्रशैलीतील काही चित्रे देखावे अशा विविध कलाकृती रेखाटून या प्लेट अधिक आकर्षक बनवल्या. इयत्ता सातवी, आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी या कलाकृती बनवल्या. यासाठी कलाशिक्षक समीर चांदरकर यांनी मार्गदर्शन केले. कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव श्रीमती विजयश्री देसाई तसेच सचिव सुनील नाईक बॅरिस्टर नाथ पै सेवांगण शाखा कट्टाचे कार्याध्यक्ष दीपक भोगटे यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले. कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय अजयराज वराडकर व सर्व संचालक मंडळ यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. प्रशालेचे मुख्याध्यापक आदरणीय एन. के. कांबळे, ज्येष्ठ शिक्षक संजय नाईक, वराडकर इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापकश्री. नाईक, डॉ. दादासाहेब कला व वाणिज्य महाविद्यालय प्राचार्य श्री. जमदाडे यांसह सर्व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

**लोकमत**

पर्यावरणपूरक गणेश मूर्ती ठरल्या लक्षवेधी

# वराडकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी राबविले विविध उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**चौके** : शाळा ऑनलाईन असल्यामुळे हल्ली आमची मुले काहीच करायला बघत नाहीत ! सारखी मोबाईल घेऊन बसतात. कोणत्याच उपक्रमात भाग घेत नाहीत. सध्या हेच शब्द आपल्या पालकांच्या तोंडून ऐकायला मिळतात. पण, या सगळ्या गोष्टी खोट्या ठरवल्या ते वराडकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी. कोविड-१९ मुळे जेव्हापासून शाळा बंद झाल्या आणि ऑनलाईन शिक्षणाला सुरुवात झाली. त्यावेळी या प्रशालेत वेगवेगळे उपक्रम राबवले गेले आणि या सर्व उपक्रमांत विद्यार्थ्यांनी हिरीरीने भाग घेतला.



वराडकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक आकर्षक गणेश मूर्ती बनविल्या. (छाया : अमोल गोसावी)

असाच एक उपक्रम या गणेश चतुर्थीच्या दरम्यान शाळेच्या कला विभागामार्फत घेण्यात आला. हा उपक्रम म्हणजे मातीपासून पर्यावरणपूरक गणेश मूर्ती बनविणे. आपल्या कोकणात गणेश उत्सवाला एक आगळेवेगळे स्थान आहे. प्रत्येक जण अगदी भक्तिभावाने या गणरायाची पूजा-अर्चा करतो. या गणेशोत्सवाचा प्रवास सुरू होतो तो मातीपासून गणपती बनवण्यापासून. प्रत्येक गावात गणपती शाळांमध्ये सुंदर, सुबक गणेश मूर्ती घडवल्या जातात. आपल्याकडे गणपतीचा कारखाना म्हणत नाहीत, तर त्याला गणपती शाळा म्हणतात. कारण, या शाळेमध्ये अगदी लहानपणापासूनच मुलांवर कलेचे संस्कार होतात.

प्रशालेत या मुलांचं गणपती बनवण्याचे कौशल्य सर्वांसमोर यावे म्हणून त्यांनी बनवलेल्या गणपती मूर्तींचे प्रदर्शन प्रशालेत श्रीदेवी शारदोत्सवाच्या निमित्ताने भरवण्यात आले. या प्रदर्शनात जवळपास पन्नास विद्यार्थी सहभागी झाले आणि मुलांचा सुंदर कलाविष्कार या प्रदर्शनाच्या निमित्ताने पाहता आला.

इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला. या प्रदर्शनातील ममता आंगचेकर, आदिती तिळवे, हर्षिता पडते, श्रेया चांदरकर, प्रथमेश नाईक, माऊली थवी, वैष्णवी चव्हाण, सृष्टी चव्हाण, हर्षल व हर्षिता कानूरकर, विराज मेस्त्री, तुकाराम मालंडकर, ध्रुवी भाट, हर्ष तांबट या विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला. या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक समीर चांदरकर यांनी मार्गदर्शन केले.

कट्टा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अजयराज वराडकर, उपाध्यक्ष आनंद वराडकर, उपाध्यक्ष प्रशांत टेबुलकर, सचिव सुनील नाईक, सचिव देसाई, शालेय समिती अध्यक्ष सुधीर वराडकर तसेच सर्व संचालक मंडळ या सर्वांनीच मुलांचे कौतुक केले.

Hello Sindhudurg
Page No. 2 Oct 19, 2021
Powered by: erelego.com

